# स्वराज्यसंकल्पक : शहाजी राजे भोसले

**डॉ. विनोद गंगाधरराव वाघाळकर**
जि.जालना.
ई-मेल-vinodwaghalkar83@gmail.com

**प्रस्तावना :**

भारताचा इतिहास हा कर्तबगार, थोर अशा नायक - नायिकांचा इतिहास आहे. तसाच तो शोषित - वंचितांच्या बाजूने आपले अख्खे जीवन खर्ची घालणाऱ्या श्रेष्ठ धुरिणांचाही इतिहास आहे. पण या इतिहासात एक न्यून आहे, मनाला वेदणा देणारी एक पडती बाजूही आहे. ती म्हणजे 'आमच्या इतिहासाचे लेखन हे प्रस्थापित इतिहासकारांनी 'आहे तसे' वा 'घडले तसे' करण्यापेक्षा 'पाहिजे तसे' वा 'हवे तसे' करण्यावरच जास्त भर दिला आहे. यामुळे जेष्ठ इतिहास संशोधक डॉ. आ. ह. साळुंखे नमूद करतात की, "भारतीय संस्कृतीचा इतिहास लिहीताना मोठया प्रमाणात खोटेपणा करण्यात आला आहे. हे वास्तव आपल्याला नाकारता येत नाही. त्यामुळं या इतिहासाचं पुनर्लेखन करणं आवश्यकच आहे.[(1)]" नेमकी हीच बाजू ध्यानात घेतली असता महाराष्ट्रातील कर्तबगार 'भोसले घराणे' अद्याप आमच्या समक्ष 'होते तसे' व 'घडले तसे' आलेलेच नाही हे नोंदवले पाहिजे. त्यातही जो इतिहास आम्ही वाचतो आणि शिरोधार्थ ठरवितो त्यात याच घराण्याची अगदी चाणाक्षपणे तथा हेतूपुरस्सर पध्दतीने बदनामी व चारित्र्यहननच केल्याचेही असंख्य पुराव मिळतील. करिता शौर्याचा व वीरतेचा मोठा वारसा असणाऱ्या भोसले घराण्यमधील 'शहाजीराजे भोसले' यांचेही खरे कार्यकर्तृत्व कुठेतरी आम्हांला आजतागायत समजू शकले नाही हे खेदानेच नमूद केले पाहिजे. यासंदर्भाने शिवभारत या परमानंद लिखित ग्रंथाचे काही मौलिक संदर्भ या शोध निबंधात आवर्जुन नोंदवले आहेत. हा ग्रंथ साक्षात छत्रपती शिवाजी महाराज यांनीच लेखनाचा आदेश देऊन पूर्ण करून घेतला होता, हे महत्वाचे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

1. शहाजीराजे भोसले यांच्यातील 'स्वराज्य संकल्पक' ही भूमिका चिकित्सकपणे अभ्यासणे.
2. शहाजीराजे भोसले यांच्या विषयी डॉ. आ. ह. साळुंखे यांनी केलेली चिकित्सा पडताळून पाहणे.

**संशोधनाची गृहितके :**

1. प्रस्थापित इतिहासकारांनी भोसले घराण्याचे केलेले इतिहास लेखन हे जसे एकांगी आहे तसेच ते विकृतही आहे.
2. शहाजी राजांना मिळालेले शिक्षण व प्रशिक्षण हे त्यांच्यातील धैर्यशील, बुध्दीमान व पराक्रमी योध्याला सिध्द करणारे होते.
3. जिजाऊ व शिवराय या आपल्या पत्नीशी अन् पुत्राशी शहाजी राजांचे संबंध प्रेमाचे, स्नेहाचे आणि विश्वासाचे होते.

4. एक पिता म्हणून शिवरायांवर त्यांनी केलेले संस्कार व घेतलेले श्रम हे त्यांच्यातील स्वराज्य संकल्पक या भूमिकेला रास्त ठरवितात.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे. यासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेतला आहे.

**जन्म, बालपण, शिक्षण व प्रशिक्षण -**

वेरुळ, मुंगी, बनसेंद्रे अशा एकुण दहा गावांची पिढीजात पाटिलकी बाबाजी भोसले यांच्याकडे होती. यांना मालोजी व विठोजी असे दोन मुले होती. या दोन्ही बांधवांनी अहमदनगरच्या निजामशाहीत सरदारकी स्वीकारल्यानंतर त्यांना पुणे व सुपे परगण्यांची जहागिरी मिळाली. पुढे सातारा जिल्हयातील फलटणच्या निंबाळकर घराण्यातील सरदार नाईक निंबाळकरांची लेक उमाबाई (दीपाबाई) यांच्याशी मालोजींचा विवाह झाला. आपल्याला पुत्र व्हावा याकरिता उमाबाईंनी अहमदनगर येथील शहाशरीफ या पीराला नवस केला. तेव्हा पुढे झालेल्या मुलांची नावे या पिराच्या नावावरुन शहाजी व शरीफजी अशी ठेवली गेली. यातील शहाजींचा जन्म 18 मार्च 1594 असा मानला जातो. (शहाजींच्या जन्म तारखे बद्दल इतिहासकारात मतभेत आहेत.) पुढे शहाजीराजे पाच वर्षांचे असतांना त्यांचे वडील मालोजीराजे हे निजामाकडून आदिलशहा विरुध्द लढताना इंदापूरच्या लढाईत मृत्यु पावले. त्यामुळे निजामशहाला आपल्या सेनेचे पंख तुटल्यासारखे वाटू लागले. मग त्याने शहाजी आणि त्यांचे लहान बंधू शरीफजी यांना बोलावून घेतले. त्यांचे सांत्वन केले. तसेच त्यांच्या पित्याचे जे वैभव होते, म्हणजेच राज्याचे जे अधिकार होते, ते त्यांच्याकडे सोपविले. शहाजीराजांना मिळालेला वारसा हा असा होता. ते वयाने लहान होते, तोपर्यंत त्यांचे चुलते विठोजी हे त्यांच्या नावाने राज्य चालवित होते. विठोजींच्या मृत्युनंतर काय घडले हे नोंदवतांना परमानंद म्हणतात, “त्यानंतर आपले चुलते विठ्ठल राज (विठोजी) हे ही निधन पावल्यावर राजनीतीचे विधी जाणणाऱ्या, आईचा शब्द मानणाऱ्या, महावीर, धैर्यशील, बुध्दीमान अशा शहाजीराजांनी राज्याची मोठी जबाबदारी आपल्या बाहुंवर धारण केली. (2)” यावरुन त्यांच्या जडणघडणीत आई उमाबाई यांचीही मोठी भूमिका असल्याचे आपल्याला दिसून येईल. तसेच तत्कालीन परिस्थितीत हवे असणारे शिक्षण वा प्रशिक्षणही शहाजीराजांना मिळाल्याचे परमानंदांच्या मांडणीवरुन स्पष्ट होते. अर्थात, तलवार आणि पट्टा चालविण्यातील कुशलता, उत्तम धनुर्धर व भाला चालविण्यातील सफाईदारपणा, त्याचबरोबर शिरस्त्राण, चिलखत, इत्यादींचा काळजीपूर्वक वापर करुन आत्मसंरक्षण करण्यासाठी घ्यावयाची खबरदारी आदीं विषयीचे प्रशिक्षण त्यांना चोखपणे मिळाले होते. यातूनच त्यांच्यात धैर्यशीलता, साहस, चिवटपणा, पराक्रम, आत्मविश्वास, महत्वाकांक्षीवृत्ती असे श्रेष्ठ गुण निर्माण होऊ शकले.

**जिजाऊंशी शहाजींचा विवाह व त्यांचे सहजीवन :**

वयाच्या अकराव्या वर्षी शहाजी राजांचा विवाह निजामशाहीतील मातब्बर सरदार लखुजी जाधव यांची कन्या जिजाबाई यांच्याशी ठरला. याबाबतीत परमानंद लिहितात, “मालोजीराजांचे पुत्र शहाजी हे वरासाठी आवश्यक असलेल्या लक्षणांनी युक्त होते. (किंवा, उत्तम लक्षणांनी युक्त होते.) ते दानवीर, दयावीर, युध्दवीर आणि महान ओजस्वी होते.(3)” म्हणजे त्याकाळी विवाहयोग्य वराकडे असणाऱ्या सर्वच क्षमता शहाजी राजांकडे होत्या हे या मांडणीतून दिसून येते. त्याकाळी कमी वयात विवाह उरकले जात. ही बाब गौण ठरविली असता स्वत:चे

शिक्षण - प्रशिक्षण, आर्थिक स्थैर्य, वेगळेपण व कार्यकर्तृत्व अशा बहुतेक अंगांनी ते परिपूर्ण होते हे लक्षात येते. त्यामुळे, “स्वत: प्रसन्न वदन असलेल्या त्यांनी (शहाजींनी) प्रसन्न वदन अशा त्यांच्याकडे (जिजाऊंकडे) दृष्टीक्षेप टाकत गृहप्रवेश केला. [(4)]” असेही परमानंद नोंदवतात. तसेच पत्नी म्हणुन जिजाऊ या देखील त्यांना अनुरुप व मोठा वारसा असणाऱ्या परिवारातून आलेल्या होत्या. करिता परस्परांचा कौटूंबिक ऋणानुबंध, जिव्हाळा, प्रेम आणि विश्वास सहजतेने व सुलभतेने वृध्दीगत होत गेला. पती - पत्नी म्हणून ते परस्परांना जपू लागले, समजून घेऊ लागले. आलेल्या जबाबदाऱ्या संयमाने आणि सचोटीने पार पाडू लागले. हे सर्व घडत असतांना कुटूंबातील इतर नातलग, त्यांच्या जबाबदाऱ्या ज्या पध्दतीने जिजाऊ समर्थपणे पेलू लागल्या अगदी तशीच तोलामोलाची साथ शहाजी राजेही त्यांना देऊ लागले. आपल्या पत्नीचे आई - वडिल, इतर नातलग मंडळी यांच्या अपेक्षा आणि भूमिकाही ते समजून घेऊ लागले. तथा प्रसंगी येणारी जबाबदारीही ते पार पाडू लागले. एका अर्थाने हे नवदाम्पत्य परस्परांच्या उत्कट भाव-भावना आणि इच्छा-आकांक्षा जपत व जोपासत असताना इतरांनाही आपल्या प्रेमाची, सेवेची तथा सहकार्याची जरुरी आहे हे जाणून ते त्या दिशेने प्रामाणिक प्रयत्नही करु लागले. या मार्गाने उमद्या मनाचे आणि जबाबदार पती - पत्नी म्हणुन लौकिक मिळवत असतांना यांच्या या सुमधुर, दृढ आणि स्थिर अशा सहजीवनात पुढे सहा पुत्रांनी जन्म घेतला. परंतु त्यातील, “शंभू आणि शिव दोघेचे वंशवर्धक झाले.” [(5)] असे परमानंद लिहितात. शहाजीराजे हे आपल्या पत्नीचा आदर करत, त्यांचे मन जपण्याचा प्रयत्न करत. याबद्दल रास्त पुरावा म्हणुन, “आपले सासरे यादवेश्वर यांची ती अवस्था झाल्याचे ऐकल्यावर महायशस्वी शहाजींनी निजामाला साहाय्य करायचे थांबवले.” [(6)] असा उल्लेखही परमानंदांनी केला आहे. म्हणजे असे की कटकारस्थानाचा आधार घेऊन जेव्हा निजामाने त्यांच्या सासऱ्यांचीच हत्या केली, तेव्हा त्यांनी या कृतीचा निषेध व धिक्कार म्हणुन आपल्या शासकास सहकार्य करणेच बंद केले. एवढेच नव्हे तर इतरही काही मोठया सरदारांना त्यांनी या कार्यामध्ये निजामाचे हितशत्रू म्हणून उभे करण्याचा प्रयास केला, तथा त्यात ते बऱ्याच अंशी यशस्वीही झाले. यातून त्यांची खरी निष्ठा ही निजामशहा बरोबर नव्हे तर आपल्या पत्नीबरोबर होती हे त्यांनी दाखवून दिले. येथे त्यांनी आपल्या पत्नीच्या हळुवार भावना जपण्याचा प्रयत्न केला, याची आपल्याला नक्कीच अनुभूती येते.

**युध्दवीर व राजनीतिज्ञ शहाजी राजे :**

शहाजी राजांचा काळ हा सतत चाललेल्या युध्दांच्या धामधुमीचा काळ होता. ते स्वत: आघाडीवर राहून लढाया जिंकत. यासाठी लागणारी शरीराची आणि मनाची कणखरता त्यांनी प्रयत्नपूर्वक मिळवली होती. यामुळे त्यांचा उल्लेख बली (बलवान), अतुलबल आणि महाबाहू असा इतिहासात आल्याचा प्रत्यय येतो. महाराष्ट्रापासून ते कर्नाटक, केरळ, तमिळनाडू आदी प्रदेशातील अनेक राजांना त्यांनी पुन: पुन्हा जिंकल्याचेही आपल्याला दिसून येते. तसेच त्यांच्या मनात आपल्या प्रजेबाबत ममता, जिव्हाळा आणि संकटसमयी धावून जाण्याची प्रवृत्तीही दिसून येते. म्हणुनच त्यांचा उल्लेख दानशूर आणि दयावीर अशा पध्दतीने आलेला आहे. तसेच ते स्वत: मातृभक्त होते. आणि हाच गुण पुढे शिवरायांमध्येही उतरल्याचा आपल्याला अनुभव येईल. ते राजनीतीचे श्रेष्ठ जाणकार असल्याचाही उल्लेख इतिहासात मिळतो. आपलेच म्हणणे रेटणे वा इतरांवर लादणे, परिस्थिती नीट समजावून न घेता मनाला वाटेल तसे

लहरी निर्णय घेणे हे कोणत्याही राज्यकर्त्याला घातक ठरत असते. हे ते उत्तम प्रकारे जाणून होते. करिता ते स्वत: विश्वासू व्यक्तींचा सल्ला घेत तथा इतर राजेही त्यांचा सल्ला घेत हे एकुण अभ्यासावरुन स्पष्ट होते.

**शिवरायांवर केलेले उत्तम संस्कार :**

शहाजीराजे हे शिवनेरीवर असोत किंवा बंगळूरमध्ये असोत, शिवरायांवर ते नितांत प्रेम करीत. स्वाभाविकच, त्यांच्या मनात भविष्य काळाविषयी काही स्वप्ने तरळत होती. आपले पुण्याचे राज्य स्वतंत्रपणे चालविण्याची क्षमता आपल्या या पुत्रामध्ये आहे, हे त्यांना हळूहळू उमजू लागले. आणि नेमके याच कारणांनी त्यांच्यातील क्षमतांचा परिपूर्ण विकास घडविण्यासाठी पिता म्हणून जे जे करणे आवश्यक होते ते ते त्यांनी सर्व केल्याचे उल्लेख इतिहासात मिळतात. जिजाऊ आणि शिवराय जेव्हा बंगळुरुमध्ये त्यांच्यारोबर वास्तव्य करीत होते तेंव्हा त्यांनी शिवरायांच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था केली होती हे स्पष्ट करतांना परमानंद लिहितात, “त्यानंतर तो गुणसंपन्न पुत्र सात वर्षाचा झाला आहे, हे पाहून आता हा लिपी शिकण्यास योग्य झाला आहे, असा राजांनी (शहाजींनी) विचार केला. मग त्यांनी मंत्र्यांच्या समवयस्क पुत्रांबरोबर आपल्या त्या मेधावी आणि स्पष्ट उच्चार करु लागलेल्या पुत्राला शिक्षकाच्या मांडीवर बसविले.”(7) अर्थात मुलाच्या भविष्याबाबत गांभीर्य व तळमळ असणारे पिता म्हणुन त्यांनी केलेली ही व्यवस्था त्यांच्यातील जागृत पित्याला अधोरेखित करते यात शंका नाही. व्यक्तिश: त्यांचे आयुष्य नेहमीच्या लढाया, धावपळ आणि दगदगीने व्यापले होते. असे असतानांही त्यांनी या सर्व घडामोडींचे निमित्त न करता आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे तत्संबंधी तयारी करवून घेण्याकडे आवर्जुन लक्ष दिले. पुढे त्यांनी तलवार, धनुष्य, भाला, पट्टा आदी शस्त्रे शिकविण्यासही योग्य त्या मार्गदर्शकांची नेमणुक केली. याच बरोबरिने गज-रथ-अश्व यांच्यावर स्वार होणे आणि त्यांची लक्षणेही जाणणे, चढणे, ओलांडणे, फिरणे, उडी मारणे या विद्यांमध्येही ते प्रवीण कसे होतील हे त्यांनी पाहिले. यामुळे वयाची बारा वर्षे पूर्ण होईपर्यंत शिवराय ‘सनय’ हे विशेषण लावण्याइतके विकसित झाले असे परमानंद नमूद करतात. सनय हा शब्द राजनीती या शब्दाने स्पष्ट करता येतो. याचा अर्थ त्यांना पुण्याकडे स्वतंत्र राज्याचा कारभार पाहण्यासाठी पाठवण्यापुर्वी त्यांना राजनीतीचेही यथोचित ज्ञान देण्यात शहाजीराजे यशस्वी झाले होते हे यावरुन लक्षात येते.

**स्वराज्य संकल्पक : शहाजीराजे भोसले :**

अशा पध्दतीने लढवय्या सेनापतीची वा सरदाराची भूमिका पार पाडत असतांना, जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी झटत असताना व परिवार आणि त्यातही आपल्या मुलाचे भविष्य अत्यंत महत्वाचे आहे अशी धारणा प्रत्यक्षात आणत असतांना आपण शहाजीरायांना पाहिले. ... उत्तम तयारी करवूण घेतल्यानंतर शिवरायांना पुण्याकडे पाठविण्याचा निर्णय पक्का झाला. या तयारीत ज्या शिक्षकांकडून सहकार्य घेतले ते संभवता सर्वच वेतन घेऊन शिकविणारे होते हे महत्वाचे. तसेच या तयारीत स्वत:कडे जे काही संपन्न अनुभव विश्व होते त्याचाही भरभरुन लाभ आपल्या मुलाला व्हावा असाही प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला. आणि यामुळेच पुढील काळात शहाजी राजांचे असंख्य गुण व क्षमता शिवरायांच्या व्यक्तीमत्वात प्रवार्धित झाल्याचा प्रत्यय आपणांस नक्कीच येतो. “आपण स्वत: प्रत्यक्षरीत्या स्वराज्य स्थापन करु शकलो नाही, यामागचे कारण सांगूण शल्य निर्धाराने दूर करण्यासाठी प्रोत्साहित केले म्हणुन तर

शहाजीराजांना स्वराज्य संकल्पक म्हटले जाते." [8] अशी रास्त भूमिका आ.ह. साळुंखे नोंदवतात. तसेच ते पुढे असेही म्हणतात की, "महाराष्ट्रात आढळणाऱ्या दंतकथांमधील तथाकथित गुरुंचा (रामदास स्वामी, दादोजी कोंडदेव) परमानंदांच्या शिवभारतात एकदाही उल्लेख आलेला नाही."[9] म्हणजेच हे गुरुंचे प्रकरण नंतरच्या काळात शिवरायांच्या महान कर्तृत्वाचे श्रेय ठराविक जात समूहाच्या नावे खपवण्याच्या विकृत प्रकाराचा एक भाग होता हे स्पष्ट होते. याच प्रकाराव्दारे शहाजी राजे यांचे कर्तृत्व आणि मुलावर केलेले श्रेष्ठतम् संस्कार आणि त्यासाठी घेतलेले अपार कष्ट हे सर्वही नाकारण्याचा देखिल प्रयास होता हे आपल्याला कळून येईल.

**सारांश :**

शहाजी राजांना मिळालेला वारसा हा नि:संदिग्धपणे रणभूमी वरील शौर्याचा व वीरतेचा होता. त्यांना मिळालेले शिक्षण तथा प्रशिक्षण हे त्यांच्यातील महान यौध्याला वा लढवय्या सेनापतीला सिध्द करणारे होते. तसेच त्यांनी आपल्या कौटूंबिक जीवनात आपल्या पत्नीचा यथोचित सन्मान व आदर केल्याचेही वारंवार दिसून येते. त्यांनी आपल्या मुलामध्ये अर्थात शिवरायांमध्ये स्वराज्य संस्थापक, यशस्वी राज्यकर्ता, प्रजाहितदक्ष राजा या थोर भूमिका साकार करण्यासाठी सर्वांगिण तयारीही करवून घेतली होती हे स्पष्ट होते. करिता ते 'स्वराज्य संकल्पक' या भूमिकेला पूर्ण न्याय देऊ शकले हे पुनरपि नोंदवलेच पाहिजे.

**निष्कर्ष :**

शिवरायांनी स्थापित केलेल्या स्वराज्याचे 'संकल्पक' म्हणून शहाजी राजांची आपल्या शिवभारत ग्रंथात परमानंदाने केलेली मांडणी व त्याअनुषंगाने आ.ह.साळुंखे यांच्या चिकित्सेचे पुढील निष्कर्ष नमूद करता येतील.

1. प्रस्थापित इतिहासकारांनी भोसले घराण्याचे म्हणजेच शिवशाहीचे केलेले लेखन हे ठराविक लोकांच्या वर्चस्वाला पुरक ठरेल असे केले आहे. याचाच भाग म्हणून अध्यात्मिक गुरु व राजकीय गुरु हे नंतरच्या काळात घुसडूण दिलेले आहेत.
2. शहाजी राजांना मिळालेला वारसा हा कर्तबगारीचा व राजकीय क्षेत्रातील शिक्षण - प्रशिक्षणाचा होता.
3. आपल्या पत्नीसह, म्हणजेच जिजाऊंसह त्यांचे नाते स्नेहांचे, प्रेमाचे व विश्वासाचे होते.
4. आपल्या मुलामध्ये भावी शासकाचे सर्व गुण प्रवर्धित व्हावे या हेतूसाठी त्यांनी अगदी प्रयत्नपुर्वक उत्तम शिक्षण व प्रशिक्षणाची व्यवस्था केली.
5. शहाजी राजे स्वत: युध्दवीर व राजनीतिज्ञ असल्याकारणाने शिवरायांना यामुळे वेळावेळी प्रेरणा व मार्गदर्शनच मिळाले.

यामुळे स्वराज्य संस्थापनेच्या मुळांशी 'स्वराज्य संकल्पक' म्हणुन शहाजीराजे यांची भूमिका व योगदान अढळ आहे हेच स्पष्ट होते.

**संदर्भग्रंथ सूची :**

1) डॉ. आ. ह. साळुंखे : हृदयातून हृदयांकडे..., लोकायत प्रकशन सातारा, प्रकाशक श्री. राकेश आ. साळुंखे, प्रथमावृत्ती - जून-2013, पृ.क्र.169.
2) डॉ. आ. ह. साळुंखे : शिवराय : संस्कार आणि शिक्षण, लोकायत प्रकाशन, सातारा, प्रकाशक - राकेश आ. साळुंखे, प्रथमावृत्ती - डिसेंबर 2010, पृ.क्र.10.

3) डॉ. आ. ह. साळुंखे : शिवराय : संस्कार आणि शिक्षण, लोकायत प्रकाशन... पृ.क्र.10... उपरोक्त.
4) डॉ. आ. ह. साळुंखे : शिवराय : संस्कार आणि शिक्षण,... लोकायत प्रकाशन ... पृ.क्र.23.. उपरोक्त
5) डॉ. आ. ह. साळुंखे : शिवराय : संस्कार आणि शिक्षण, लोकायत प्रकाशन.... पृ.क्र.23... उपरोक्त.
6) डॉ. आ. ह. साळुंखे : शिवराय : संस्कार आणि शिक्षण, लोकायत प्रकाशन... पृ.क्र.23... उपरोक्त
7) डॉ. आ. ह. साळुंखे : शिवराय : संस्कार आणि शिक्षण, .... पृ.क्र.31... उपरोक्त.
8) डॉ. आ. ह. साळुंखे : शिवराय : संस्कार आणि शिक्षण, .... पृ.क्र.30... उपरोक्त
9) डॉ. आ. ह. साळुंखे : शिवराय : संस्कार आणि शिक्षण, पृ.क्र.38... उपरोक्त.